फोन : (०२४६२) २२९२४२ / ४३
फॅक्स : (०२४६२) २२९२४५ / २२९३२५

Phone : (02462) 229242 / 43
Fax : (02462) 229245 / 229325

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

शैक्षणिक/संलग्न/०३/२००६–२००७/6893 दिनांक ०६.११.२००६ 07

प्रती,
अध्यक्ष/सचिव,
सरस्वती शिक्षण संस्थेचे
अध्यापक महाविद्यालय,
किनवट,जि.नांदेड.

विषय:— शैक्षणिक वर्ष २००६–२००७ करीता बी.एड. या अभ्यासक्रमाचे नवीन अध्यापक महाविद्यालय किनवट, जि.नांदेड येथे सुरू करणेबाबत.

संदर्भ :
१. मा.विभागीय संचालक, एन.सी.टी.इ. भोपाळ यांचे पत्र क्र. डब्ल्यु.आर.सी./५–६/८९/२००६/ दि. २७ स्पटेंबर २००६
२. मा.श्री.सु.बा.तुंबारे, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. बीएड मान्यता २००६/(४९५/०६) मशि १ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२ दि. ०६ ऑक्टोंबर २००६
३. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सिव्हील अपील क्र. १८५९/२००६ व १८६०/२००६ अरायजिंग आऊट ऑफ एस.एल.पी. (सिव्हील) क्र. २०९१८/२००५ व एसएलपी (सी) २०९६९ – २०९७७/२००५ वरील मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. ३१ मार्च २००६ चे आदेश

महोदय,

संदर्भांकित विषयास अनुसरून आपणास कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेला राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषेदने दि. २७ स्पटेंबर २००६ च्या आदेशानुसार १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन बी.एड. महाविद्यालय किनवट, जि.नांदेड येथे सुरू करण्यासाठी दिलेली मान्यता तसेच महाराष्ट्र शासनाने संदर्भीय पत्र क्र.०२ अन्वये आपल्या संस्थेच्या नवीन महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००६–०७ पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालयास कायम विना अनुदान तत्वावर दिलेली मान्यता आणि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या संदर्भ क्र.०३ च्या निर्णयानुसार *आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २००६–०७ पासून तात्पुरते संलग्निकरण देण्यात येत आहे.* विद्यार्थ्यांचे प्रवेश हे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राज्यातील केंद्रीभूत पध्दतीने योग्य त्या अधिकार मंडळाची /अधिका–याची मान्यता घेऊनच करावेत. या बदलचे त्या अधिकार मंडळाचे/अधिका–याचे पत्र विद्यापीठास सादर करावे.

तसेच, पुढे आपणास कळविण्यांत येते की, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ८१ मधील तरतुदी व इतर ज्या तरतुदी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाशी विसंगत नाहीत अशा सर्व तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. आपण त्याबाबतचे हमीपत्र विद्यापीठाकडे दिल्यानंतर प्रवेश प्रक्रीया सुरू करावी. त्यानुसार या बाबतची पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

०२...

तथापि, प्रथम संलग्निकरण समितीची शिफारस व आगामी मा.विद्या परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहूनच प्रथम संलग्निकरणाची कार्यवाही करण्यांत येईल. यास्तव महाविद्यालयास प्रथम संलग्निकरण प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील, अन्यथा पुढील वर्षी संलग्निकरणाचे नूतनीकरण करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

आपली संस्था भविष्यात अनुदानाची किंवा आर्थिक मदतीची मागणी करणार नाही या आशयाचे हमीपत्र मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना सादर करावे. सदर हमीपत्राची एक प्रत विद्यापीठाकडेही सादर करण्यात यावी. तसेच नियमाप्रमाणे संलग्निकरण शुल्क रूपये ३३,००० विद्यापीठात त्वरीत जमा करण्यांत यावे. विद्यापीठाने व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमाचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू
sd
संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत आपल्या माहितीस्तव :

१) मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
२) मा.संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे. १
३) मा.सहसंचालक, उच्च शिक्षण नांदेड विभाग, नांदेड.
४) परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ.
५) अधिक्षक, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) निवडणूक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ.
७) अधिक्षक, अभ्यासक्रम कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ